# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०—२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०—२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ—मेल : dyracademic@unipune.ac.in

संदर्भ क. : सीए/३३६१

दिनांक : ०९/०९/२०१६

## परिपत्रक क. १६३/२०१६

**विषय : विज्ञान विद्याशाखेअंतर्गत बी.एस्सी. (हॉस्पिटॅलिटी स्टडीज) या पदवीच्या संलग्नीकरणाबाबत...**

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व सबंधितांस या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, ज्या संलग्नित महाविद्यालयांना/मान्यताप्राप्त संस्थाना बी.एस्सी. (हॉस्पिटॅलिटी स्टडीज) या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१५-१६ व २०१६-१७ या दोन वर्षासाठी व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत संलग्निकरणाच्या नूतनीकरणास मान्यता देण्यात आलेली आहे, अशा संलग्नित महाविद्यालयांना/मान्यताप्राप्त संस्थाना मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क. ७७६४/२०१५ वरील दिलेल्या दि. १७ मार्च, २०१६ रोजीच्या आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६ व २०१६-१७ या दोन वर्षाकरीताच बी.एस्सी. (हॉस्पिटॅलिटी स्टडीज) हा अभ्यासक्रम संलग्नीत महाविद्यालये अथवा मान्यताप्राप्त व्यवस्थापन संस्थेतही चालविता येईल. सदर अभ्यासक्रम हा विज्ञान विद्याशाखेत राबविला जात आहे असे समजण्यात येईल.

ज्या महाविद्यालयांमध्ये विज्ञान विद्याशाखेअंतर्गत विद्यापीठ मान्य किमान पदवीस्तरावरील अभ्यासक्रम चालविले जात आहेत अशा महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षासाठी जर त्यांना बी.एस्सी. (हॉस्पिटॅलिटी स्टडीज) विज्ञान विद्याशाखेत हा अभ्यासक्रम राबवायचा असल्यास त्यांनी दि. ३१ ऑक्टोबर, २०१६ पूर्वी ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाकडे अर्ज सादर करावेत.

तसेच ज्या मान्यताप्राप्त संस्थामध्ये बी.एस्सी. (हॉस्पिटॅलिटी स्टडीज) हा अभ्यासक्रम व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत राबविण्यास मान्यता देण्यात आली होती अशा संस्थानी दि. ३१ ऑक्टोबर, २०१६ पूर्वी बी.एस्सी. (हॉस्पिटॅलिटी स्टडीज) हा अभ्यासक्रम विज्ञान विद्याशाखेअंतर्गत राबविण्यात येणार असल्याने विज्ञान विद्याशाखेसाठीच्या नवीन महाविद्यालयांसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरुन विद्यापीठामध्ये हार्ड कॉपी सादर कराव्यात. ज्या संस्थाचे अर्ज महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी

निर्गमित केलेल्या आदेशानुसार पात्र ठरतील व ज्या महाविद्यालयांसाठी शासनाकडे विद्यापीठ शिफारशी सादर करेल व अशा शिफारशीवर उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी परवानगी दिल्यास शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षापासून बी.एस्सी. (हॉस्पिटॅलिटी स्टडीज) हा अभ्यासक्रम विज्ञान विद्याशाखेअंतर्गत चालविण्यासाठी महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्यात येईल.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांचे मा. प्राचार्य/मा.संचालक यांनी सदर परिपत्रकाचा आशय सर्व सबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

संचालक
(म.वि.वि.मं.)

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी :—
१. मा. अधिष्ठाता विज्ञान व व्यवस्थापन विद्याशाखा
२. मा. संचालक, (म.वि.वि.मं.)
३. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
४. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये/मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था
५. मा. परीक्षा नियंत्रक, सा. फु. पुणे विद्यापीठ
६. मा. उपकुलसचिव, परीक्षा (१,२)
७. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश
८. मा. उपकुलसचिव, नियोजन व विकास
९. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक पात्रता
१०. मा. उपकुलसचिव (सभा व दप्तर)
११. सहायक कुलसचिव परीक्षा समन्वय
१२. सहायक कुलसचिव (परीक्षा एस अॅन्ड टी विभाग)
१३. सहायक कुलसचिव (गोपनीय कक्ष)
१४. मा. वरिष्ठ कायदा अधिकारी
१५. मा. जनसंपर्क अधिकारी
१६. कक्षाधिकारी (बहि:स्थ)
१७. कक्षाधिकारी (पात्रता विभाग)
१८. मा. सिस्टीम अॅनालिस्ट डेटा प्रोसेसिंग युनिट
१९. प्रमुख, विद्यापीठ उपकेंद्र : अहमदनगर, नाशिक